# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक योगदान

**प्रा. दत्ता जाधव**

श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटिल कन्या महावीद्यालय , इचलकरंजी

.................................................................................................................................................

**प्रस्तावना**

संत आणि क्रांती हि दोन तत्वे एकाच व्यक्तिमत्वात सहसा वास करत नाहीत.महाराष्ट्राच्या पवित्र आणि महान भूमीत असा एक पुरुष होऊन गेला कि ज्याच्या व्यक्तिमत्वात संतत्व आणि क्रांती ही दोन्ही तत्वे वास करत होती.आजपासून सुमारे ६६ वर्षांपूर्वी सातारा नगरीत ६जून १६१६ रोजी या महापुरुषाचा जन्म झाला.बालपणीच मातृ–पितृ छत्र हरपले पण आपलं संपूर्ण जीवन या अवलीयाने निराधाराना आधार देऊन मातृ–पितृ ची भूमिका महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात बजावली. तो अवलिया म्हणजे श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर चे संकल्पक ,संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे उर्फ गोविंद ज्ञानोजी साळुंखे होय!

**उद्धिष्टय** शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक योगदानाचा अभ्यास करणे.

**विषयप्रवेश**

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील रामापुर या छोट्या खेड्यात प.पू. बापूजींचा जन्म झाला.प्राथमिक शिक्षण रामापुर येथेच पूर्ण केले.माध्यमिक शिक्षण इस्लामपूर येथे वार लावून पूर्ण केले. एक वेळच्या अन्नाची भ्रांत असणाऱ्या या महापुरुषाने पुढील काळात महाराष्ट्रातील बहुजनांच्या अन्नाची भ्रांत भागविली.उच्च शिक्षणासाठी कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयात प्रवेशीत झाले.या ज्ञानसंकुलात बापूजींना डॉ.आप्पासाहेब पवार गुरू म्हणून लाभले.बापूजींच्या कुशाग्र अन चाणाक्ष बुद्धिमत्तेवर डॉ .पवार यांचा प्रचंड विश्वास होता.डॉ.पवारांनी बापूजींना कर्नाटकातील सोंडूर संस्थान चा इतिहास लिहण्यासाठी धाडले.इतिहास संशोधनाचे कार्य करत असताना संस्थानातील राजकुमारांना शिकविण्याचे कार्य हि बापूजींनी केले.समकाळात १६४२ चा स्वातंर्त्य लढा देशात सुरु होता. विलायतेला राजकुमारां बरोबर जाण्याची संधी बापूजींना आली होती.पण,बापूजींचे मन भारतमातेच्या स्वातंर्त्या साठी आसुसले होते.सोंडूर संस्थानाचा निरोप घेऊन बापूजी स्वातंर्त्य लढ्यात कार्यमग्न झाले.यावेळी बापूजी यांनी सातारा जिल्हा काँग्रेस ची जबाबदारी हि लीलया पेलली . स्वातंर्त्य चळवळीत कार्य करत करत बापूजी यांनी बी. ए. ची पदवी हि संपादित केली.संस्कृत आणि इंग्रजी हे त्यांच्या आवडीचे विषय होते.कर्मवीर भाऊराव पाटील निधी समितीचे बापूजी अध्यक्ष बनले. ष्जोपर्यंत १ लाख रुपयांचा कर्मवीर निधी गोळा करणार नाही तोपर्यंत पायात वहाणा घालणार नाही ष अशी भीष्म प्रतिज्ञा बापूजी यांनी केली.तो कर्मवीर निधी म.गांधी यांच्या हस्ते कर्मवीरांच्या कडे सुपूर्द करावा हि बापूजींची आंतरिक तळमळ होती.ष्गोविंद साळुंखे आम्हास राजकारणासाठी द्याष्अशी मागणी कर्मवीरांच्या कडे तत्कालीन पुढाऱ्यांनी केली.कर्मवीर म्हणाले,ष्एकवेळ मी राजकारणात येईन पण बापूजी नाही.ते आम्हास शिक्षण प्रसाराच्या कामास हवेत.ष या प्रसंगावरून कर्मवीर व बापूजी यांचे संबध किती आंतरिक जिव्हाळ्याचे होते हे स्पष्ट होते.सन १६४८ ते सन १६५५ पर्यंत बापूजीं यांनी रयत शिक्षण संस्थेत उल्लेखनीय काम केले.बापूजी यांचे रयते मध्ये मन रमले नाही.बहुजन रयतेला विवेकी दृष्टिकोन देण्यासाठी बापूजी यांनी स्वतंत्र शिक्षण संस्था स्थापन करण्याचा संकल्प केला. मानवतावाद हा बापूजींचा ध्येयवाद होता.६ जून १६५५ रोजी श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना झाली.५ माध्यमिक विद्यालये,२वसतिगृहे व १महिला अध्यापक विद्यालय या ८ संस्कृती केंद्राने संस्थेच्या कार्याचा शुभारंभ झाला .

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था का स्थापन झाली याबद्दल बापूजी म्हणतात,षदि.१५ ऑगस्ट १६४७ रोजी देशाला स्वातंर्त्य मिळाल्या नंतर समाजजीवनात एक प्रकारची शिथिलता निर्माण झाल्याचे दिसत होते.स्वातंर्त्यपूर्व काळात त्यागाचे,ध्येयाचे आणि आत्मसमर्पण करून समाजासाठी व देशासाठी झिजण्याच्या ज्या प्रेरणा होत्या त्या प्रेरणांनाची प्रखरता कमी होत चालली होती.सुखासीनता व स्वार्थ झपाट्याने वाढत होता. या प्रवृत्तींच्या वाढीने राष्ट्र जीवन व समाज जीवन विस्कळीत होईल याची भीती वाटत होती ,म्हणूनच स्वातंर्त्यपूर्व काळातील खडरतरते च्या प्रेरणा जिवंत ठेवाव्यात किंबहुना अधिक प्रज्वलित कराव्यात म्हणून संस्थेची स्थापना केली.समाजातील प्रमुख व्यक्तींची व शासनाची

सहानुभूती यथावकाश मिळविण्याचा प्रयत्न केला.९ बापूजींचे प्रस्तुत विचार समाज व राष्ट्र जीवनाबद्दल किती विशाल होते याची प्रचिती येते.सुसंस्कार युक्त शिक्षणानेच नवसमाज निर्माण करावयाचा आजचा युगधर्म आहे.सत्य,शील,प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा हि गांधी तत्वे बापूजी संपूर्ण आयुष्य जगले.कबीर,राम, रहीम,ख्रिस्त,बुद्ध हे बापूजीं चे आदर्श होते.बहुजनांच्या सामाजिक ,धार्मिक,आर्थिक मागासलेपणाचे कारण अज्ञान हे आहे हा म.फुले यांचा विचार बापूजींच्या मनात होता. आदिवासी,डोंगरी ,दुष्काळी क्षेत्र बापूजींनी शिक्षण प्रसारासाठी कार्यक्षेत्र निवडले.

आपल्या जबाबदारीचे भान करून देते ते शिक्षण हि बापूजी यांची शिक्षणाची व्याख्या होती.ज्या वेळी राष्ट्र संकटात येईल त्यावेळी बापूजीं नी संस्थे पेक्षा राष्ट्राला महत्व दिले.राष्ट्रभक्ती हा त्यांच्या सेवाव्रताचा आत्मा होता.भारत बांगलादेश युद्धात बापुजी नी संस्थेच्या माध्यमातून 2 लाख रुपयाचा चेक तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कडे सुपूर्द केला. हा वारसा त्यांच्या पुढील पिढीनेही चालवला .संस्थेचे विद्यमान अध्यक्ष व बापूजींचे सुपुत्र मा. प्राचार्य. अभयकुमार साळुंखे यांनी संस्थेच्या माध्यमातून मागील वर्षी महाराष्ट्र सरकारकडे दुष्काळ निधी म्हणून रुपये,५२,२६,११३ रुपयांचा चेक महाराष्ट्र सरकारला दिला.संत तुकाराम यांनी तत्कालीन काळात महाराष्ट्रात दुष्काळ पडल्यावर जसे आपल्या घरची धान्याची गोदामे जनतेला खुली केली तसेच हे कार्य मानायला हवे. बापुजी त्यांच्या त्यागमय कृती ने संतत्वास पोहचलेले शिक्षण संत ठरतात.

**निष्कर्ष**

ज्ञानवर्धन, ज्ञानसंवर्धन, ज्ञानदान याच आपल्या जीवित कार्याशी एकनिष्ठ राहून चौतन्याची म्हणजे ज्ञानाची अखंड सेवा करणाऱ्या या महापुरुषा चे २०१८–२०१९ हे जन्मशताब्दी वर्ष आहे. भारत सरकारने प. पू. बापूजींच्या कार्याचा गौरव उचित नागरी सन्मान देऊन करण्याची हीच योग्य वेळ आहे!!!

प. पू. बापूजींना त्रिवार अभिवादन!!!

**संदर्भ**

१)विवेकदिप, खंड १,संपादक– प्राचार्य एन जी गायकवाड,२०२०
२)विवेकदिप, खंड २,संपादक– प्राचार्य एन जी गायकवाड,२०२०
३) ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षण परंपरा–लेखक–रा. ना. चव्हाण
४) पत्रातून भेटणारे बापूजी – संपादक डॉ . शरद साळुंखे